




REGISTERED No. B. 3434

# अर्थ

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति। —कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे ★ सहसंपादक—श्री. वा. काळे

वर्ष ११ | पुणें, बुधवार तारीख १९ डिसेंबर, १९४५ | अंक ५०



## —: साठे बिस्किटें :—

### ऑरेंज व श्रूसबरी

आतां स्थानिक ग्राहकांस अल्प प्रमाणांत मिळूं लागलीं. युद्धसमाप्ति झाली असल्याकारणानें परगांवचे ग्राहकांसहि हळू हळू मिळूं शकतील.

—साठे बिस्किट कं., पुणें २

## विमा—काम—बक्षिसें

'सह्याद्रि' प्रतिनिधींसाठी बक्षिसांची अपूर्व योजना !
'सह्याद्रि' विमेदारांना किमान हप्ते व भरपूर सवलती !!
एजन्सी व पॉलिसी अत्यंत फायदेशीर.

| | | |
|---|---|---|
| —शाखा— | अधिक माहितीसाठी | गो. ग. सौंदणकर |
| काळभोर आणि कं., पुणें. | लिहा अगर भेटा. | मॅ. डिरेक्टर, सह्याद्रि विमा कं. नासिक. |

## न्यू इंडिया इंडस्ट्रीज लि.

( Approved Re-treaders and Approved Contractors )

२६ लॅमिंग्टन नॉर्थ, मुंबई ११.

### महाराष्ट्रांतील रबराचा प्रमुख कारखाना

★ गिरणीचे रोलर्स ★ रबरी हातमोजे ★ छापखान्यांचे रोलर्स
★ रीमोल्ड टायर्स ★ रबरी वॉशर्स ★ सॉलिड व्हील्स

व इतर रबरी माल तयार होतो.

पु. ग. मराठे
मॅनेजिंग डायरेक्टर.

# विविध माहिती

**सिंदिया स्टीम नॅव्हिगेशन कं. लि.**

सिंदिया स्टीम नॅव्हिगेशन कंपनीनें हिंदुस्थानांत ८,००० टनांचें जहाज बांधण्यास सुरुवात केली असून त्यास अंदाजें ३० ते ३२ लक्ष रुपये खर्च येणार आहे. हिंदुस्थानांत तयार होणारें हें पहिलेंच जहाज असून त्याची लांबी ४०० ते ४१५ फूट असेल. बांधकाम विजगापट्टम येथील सिंदिया कंपनीचे शिपयार्ड-मध्यें चालू आहे.

**कागद न मिळाल्यास इजिप्तमधील वर्तमानपत्रें बंद पडणार**

ब्रिटिश सरकारनें योग्य वेळीं कागदाचा पुरवठा न केल्यास इजिप्तमधील वर्तमानपत्रें व मासिकें जानेवारी १९४६ पासून बंद ठेवावीं लागतील. इजिप्तला मिळणारा पांच हजार टन कागद वहातुकीच्या जहाजांच्या टंचाईमुळें अद्याप मिळाला नाहीं.

**मासळीसाठीं लॉर्ड पेथिक लॉरेन्स रांगेंत उभे**

भारतमंत्री लॉर्ड पेथिक लॉरेन्स मासळी घेण्यासाठीं सरे परगण्यांतील आपल्या शेरी या खेडेगांवीं रांगेमध्यें उभे राहिलेले दाखविणारें एक चित्र लंडनच्या एका वृत्तपत्रांत छापलें आहे.

**मध्यवर्ती विधिमंडळ**

फेब्रुवारी १८ ते २० रेलवे बजेट मध्यवर्ती मंडळापुढें वाद-विवादासाठीं येईल. फेब्रुवारी २२ आणि २५ ते २७ या दिवशीं बजेट ग्रँटवर मतदान होईल. फेब्रुवारी २८ रोजीं सर्वसाधारण बजेट सभासदांपुढें ठेवण्यांत येईल, ४ मार्चला त्यावर चर्चा होईल व मार्च ८ व ९ तारखेला ग्रँटसवर मतदान होईल.

**लष्करांतून कमी झालेल्या लोकांची आय. सी. एस.मध्यें जाण्याची तयारी**

लष्करी नोकरींतून खाली झालेल्या २,००० लोकांनीं आय. सी. एस., पोलिस व पोलिटिकल खात्यांत असणाऱ्या २०० जागांसाठीं अर्ज केले आहेत.

**चीनमधील अमेरिकन हितसंबंध**

गेल्या महायुद्धांत जर्मनी व जपान या राष्ट्रांचा पराभव होऊन ब्रिटिश व फ्रेंच साम्राज्यशाही खिळखिळी झाल्यामुळें अमेरिकेला चीनमध्यें व्यापारी साम्राज्यशाही स्थापण्याला रान मोकळें झालें आहे असें कम्युनिस्ट पार्टीच्या एका अमेरिकन मासिकानें लिहिलें आहे.

**वीज जास्त वेळ देतां येईल**

इंजनें चालविण्यास लागणाऱ्या तेलाच्या तुटवड्यामुळें, मुंबई प्रांतांतील तेलावर चालणाऱ्या विद्युत्गृहांनीं विजेचा पुरवठा दररोज किती वेळ करावा, हें १९४२ सालापासून सरकारनें नियंत्रित केलें होतें. आतां तेलाचा पुरवठा थोडा सुधारला आहे, त्यामुळें जास्त वेळ वीज देण्यास परवानगी देण्यांत आली आहे. उदाहरणार्थ, जळगांवास पूर्वी १२½ तासांची परवानगी होती, आतां तेथें २२ तास वीज देतां येईल. महाड, बारामती, जुन्नर, वाई, इत्यादि ठिकाणीं ६ तासांऐवजीं १२½ तास वीज पुरविण्यास आतां परवानगी आहे.

**भांडवल उभारणीवरील निर्बंध**

कोणत्याहि बारा महिन्यांच्या एका अवधींत पांच लक्ष रुपयांची भांडवल उभारणी करावयाची असल्यास त्यास हिंदुस्थान सरकारच्या परवानगीची आवश्यकता नाहीं, असें हिंदुस्थान सरकारनें जाहीर केलें आहे. बँका व विमा कंपन्या ह्यांस मात्र भांडवल उभारणीसाठीं सरकारची आगाऊ परवानगी घ्यावी लागेल.

**दि न्यू सिटिझन बँक ऑफ इंडिया लि.**

**हेड ऑफिस : फोर्ट, मुंबई**

**खेळतें भांडवल : २ कोटि रुपयांवर**

—शाखा—

स्थानिकः—१ दादर, २ गिरगांव, ३ सँट रोड, ४ जव्हेरी बाजार, ५ शींव, ६ विलेपार्ले, ७ माटुंगा.

इतरः—८ अमरावती, ९ अहमदनगर, १० बेळगांव, ११ बडनेरा, १२ दिल्ली, १३ देवळाली, १४ धुळें, १५ इचलकरंजी, १६ जळगांव, १७ कोल्हापूर, १८ करंजा, १९ लोणंद, २० मिरज, २१ महाड, २२ मालेगांव, २३ नागपूर, २४ नाशिक शहर, २५ नाशिक रोड, २६ नंदुरबार, २७ पुणें शहर, २८ सांगली, २९ सोलापूर, ३० सिन्नर, ३१ संगमनेर, ३२ चांदा, ३३ अकोला, ३४ कोपरगांव, ३५ पेण, ३६ मलकापूर, ३७ अहमदाबाद.

—बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात—

डी. एन. गांडेकर, बी. ए., एलएल. बी. मॅनेजर, पुणें शाखा.

डी. डी. देशपांडे, बी. ए. मॅनेजिंग डायरेक्टर.

**पायोनियर डाईंग हाऊस**

—दातेवाडी, पुणें—

**पक्क्या रंगाचीं कामें करून मिळतात.**

**रंगाची गॅरंटी हेंच आमचें ध्येय.**



# अर्थ

वा. व. ४ रु. ( ट. स. माफ. ) किरकोळ अं. २ आणे.


## अन्याय्य कर्जाचा डोंगर, हें स्वार्थत्यागाचें फळ !

अँग्लो-अमेरिकन कर्जविषयक कराराचा मसुदा तयार होऊन त्यावर ग्रेट ब्रिटन व अमेरिका ह्या दोन्ही राष्ट्रांच्या प्रतिनिधींनीं सह्या केल्या असल्या तरी प्रस्तुत करारास त्या राष्ट्रांच्या विधिमंडळांची मान्यता मिळाल्याविना बंधनकारक स्वरूप प्राप्त होणार नाहीं. अशा तऱ्हेची ब्रिटिश कॉमन्स सभेची मान्यता मिळविण्याकरितां फडणवीस, सर ह्यू डाल्टन ह्यांनीं त्या सभेंत ठराव मांडला आणि त्या ठरावावर भाषण करतांना कर्जविषयक कराराची पार्श्वभूमि व त्यांच्या वाटाघाटी ह्यांचा तपशील सांगितला. ब्रिटिश प्रतिनिधींनीं तीन महिने कसून प्रयत्न करून अमेरिकेकडून शक्य तेवढ्या सवलती मिळविल्या आणि त्याबाबत चाललेल्या वाटाघाटी मोडण्याचाहि अनेकवार प्रसंग उद्भवला. करारानें बद्ध होणाऱ्या दोन्ही पक्षांना त्यातील अटी पसंत पडल्या पाहिजेत आणि जेव्हां त्या दोन पक्षांपैकीं एकाची भूमिका प्रबळ असते तेव्हां दुसऱ्यास आपला मुद्दा विवक्षित मर्यादेपलीकडे जाऊन जोरानें मांडतां येत नाहीं. त्याची बाजूच पडती असते. अँग्लो–अमेरिकन कराराची छाननी अमेरिकन विधिमंडळ व ब्रिटिश विधिमंडळ हीं आपापल्या दृष्टिकोनानें करणार हें उघड आहे. अशा परिस्थितींत ब्रिटिश प्रतिनिधींनीं वाटाघाटींत आपल्या देशास अधिकाधिक सवलती मिळविल्या आहेत आणि आतां त्या अपुऱ्या आहेत असें म्हणण्यास वावच उरलेला नाहीं. कर्जविषयक करारावर कॉमन्स सभेंत मतमोजणी करण्यांत आली तर विरोधी पक्ष करारास विरोध करणार नाहीं असें सर जॉन अँडरसन ( माजी सर्वपक्षीय सरकारचे फडणवीस ) ह्यांनीं सांगितलें, ह्याचा अर्थच तो आहे.

ग्रेट ब्रिटननें अमेरिकेकडून प्रथम मदतीसाठी ग्रँट किंवा बिनव्याजी कर्ज मागितलें, परंतु हें व्यावहारिक होणार नाहीं आणि अमेरिकन काँग्रेस अशा व्यवस्थेस कधींच मंजुरी देणार नाहीं असा त्या मागणीस रोखठोक जबाब मिळाला. ग्रेट ब्रिटनच्या इच्छेचे मानानें त्यास अमेरिकेनें फारच थोडें दिलें, परंतु त्यास उपाय काय? आणि दिलेलें घ्यावयाचें नाहीं म्हटलें तर दुसरें काय करतां येणार? अँग्लो-अमेरिकन करारास आपण मान्यता दिली नाहीं तर रोटी वगैरे वगळून बाकी कोणतेंच अन्न आपणांस पुरेसें मिळणार नाहीं आणि कपास व तंबाखू तर फारच कमी प्रमाणांत मिळूं शकेल आणि ह्याचा लोकांचे मनावर अत्यंत निराशाजनक परिणाम होईल असें मि. डाल्टन ह्यांनीं सांगितलें. आतां आपण अत्यंत भयंकर आणि भीतिदायक काळांत प्रवेश करीत आहों आणि त्या वेळीं अमेरिका व ग्रेट ब्रिटन ह्यांचें सहकार्य कायम रहाण्यास प्रस्तुत करार उपयुक्त होईल असें ते म्हणाले. ग्रेट ब्रिटनला अमेरिकेचें सहाय्य ह्या कठीण प्रसंगीं मिळवितां आलें नाहीं, तर त्याची परिस्थिति फार बिकट होईल असा त्याचा अर्थ आहे.

युद्ध जिंकून जागतिक हितासाठीं ग्रेट ब्रिटननें प्रचंड स्वार्थत्याग केला, परंतु त्याचें त्याला फळ काय मिळालें? कर्जाचा डोंगर! इतिहासकार ह्या घटनेवर कडक टीका केल्याविना रहाणार नाहींत, असे उद्गार मि. डाल्टन ह्यांनीं काढले. ब्रिटिश लोकांच्या मनांत, प्रस्तुत कर्जाबाबत कोणते विचार घोळत आहेत आणि त्या लोकांवर अन्याय झालेला आहे अशी त्यांची भावना कशी झालेली आहे, ह्याचें प्रतिबिंब वरील उद्गारांत आढळतें. अमेरिकेनें युद्धसहाय कांहीं थोडें केलेलें नाहीं. ग्रेटब्रिटनचे हितसंबंध युद्धांत किती तरी अधिक पटीनें गुंतलेले होते, हें येथें लक्षांत घेतलें पाहिजे. ब्रिटिश स्वार्थत्यागाचें अपेक्षेइतकें चीज झालें नाहीं व अमेरिकेच्या अटी ब्रिटिशांना निमूटपणें मान्य कराव्या लागल्या, ही त्यांची स्वाभाविक भावना आहे.

अमेरिकेनें ग्रेट ब्रिटनला द्यावयाच्या कांहीं कर्जाचा विनियोग स्टर्लिंग गटांतील देशांचे देणें फेडण्याकडे करतां यावा, अशी ब्रिटिश मागणी होती तिला अमेरिकन प्रतिनिधींनीं मुळींच सहानुभूति दर्शविली नाहीं. ग्रेट ब्रिटनचें स्टर्लिंग गटांतील देशांचें देणें अजूनहि वाढत चाललेलें आहे, कारण ब्रिटिश निर्गतींतून त्यास आयात मालाचे पैसे देतां येण्याजोगी अद्याप परिस्थिति नाहीं. हिंदुस्थान, इजिप्त इत्यादि स्टर्लिंग गटांतील देशांचें ग्रेट ब्रिटननें देणें फेडावयाचें आहे, त्यांत काट सुचविण्यांत येणार आहे. ज्या स्वार्थत्यागाचें पुरेसें चीज अमेरिकेनें केलें नाहीं, तें करण्यास ह्या देशांना संधि मिळणार आहे. हिंदुस्थाननें आपल्या येण्यांत अवास्तव काट मान्य करूं नये, अशी येथील पुढाऱ्यांची भूमिका आहे. ग्रेट ब्रिटन व हिंदुस्थान ह्यांच्या सरकारांनीं सहमतानें हा प्रश्न सोडवावयाचा आहे. परंतु, अँग्लो-अमेरिकन कराराचे वाटाघाटींत ग्रेट ब्रिटनची एका अर्थानें भूमिका कमजोर होती; दुसऱ्या दृष्टीनें हिंद-ब्रिटन वाटाघाटींत हिंदुस्थानची भूमिकाहि कमजोर रहाणार हें उघड आहे.

ह्या संबंधांतील खरा निर्णय राष्ट्रीय सरकारच करूं शकेल आणि आजच्या राज्यघटनेंत तें कांहीं शक्य नाहीं. हिंद-ब्रिटन वाटाघाटींत भाग घेण्यास कांहीं बिनसरकारी लोकांनाहि आमंत्रण दिलें जाईल, असें समजतें. हिंदुस्थान सरकारचे फडणवीस, सर आर्किबाल्ड रौलंडस ह्यांच्याकडेच अर्थात हिंदी प्रतिनिधींचें नेतृत्व राहील. ग्रेट ब्रिटन प्रत्यक्ष फेडूं शकेल, एवढ्या रकमेवरच त्या देशानें हिंदुस्थानाचें द्यावयाचें देणें तोडावें लागेल, ह्या भूमिकेवर प्रस्तुत प्रतिनिधि मंडळ वाटाघाटी करील, हें उघड आहे. दरिद्री हिंदुस्थानास त्याच्या येण्यांत कपात सहन होणार नाहीं आणि दरमाणशी मोठें उत्पन्न असणाऱ्या कॅनडा किंवा ऑस्ट्रेलिया ह्यांचा दाखला येथें लागू पडणार नाहीं. हिंदी राष्ट्राच्या शीघ्र औद्योगीकरणास कोणत्याहि प्रकारचा बाध येणार नाहीं, ह्या दृष्टीनेंच हिंदुस्थान सरकारनें प्रस्तुत विषयाकडे पाहिलें पाहिजे. हिंदी लोकमत न अजमावतां करारानें बद्ध होण्यांतील अडचणींचा विचार सरकारनें वेळींच करणें जरूर आहे.

---

### अमेरिकेचें कर्ज नाकारल तर ?

‘ अमेरिकेचें कर्ज घेण्याचें ग्रेट ब्रिटननें नाकारलें, तर लँकेशायरच्या गिरण्या चालू शकणार नाहींत. अमेरिकन कपाशीऐवजी इजिप्तची कपास त्यांना वापरावी लागेल, ती तात्काळ मिळणारहि नाहीं. त्यामुळें कापड कमी तयार होईल व कपडे अपुरे पडतील. मग निर्गतीची भाषाच नको. ’ :—डॉ. डाल्टन, ब्रिटिश फडनवीस.

### अमेरिकेचें कर्ज स्वीकारलें तर ?

‘ ग्रेटब्रिटननें अमेरिकेचें कर्ज स्वीकारलें, तर रशिया वगळून बाकीच्या सबंध जगावरील आर्थिक सत्ता अमेरिकेच्या हातीं जाईल. लंडनचें आर्थिक केंद्र म्हणून असलेलें महत्त्व नष्ट होईल. अमेरिकेंत बाहेरील मालाची आयात मोठ्या प्रमाणावर होऊं शकेल अशा तऱ्हेचें जकातीचें धोरण आखण्याची त्या देशावर जबाबदारी नाहीं. प्रस्तुत करार हा ग्रेट ब्रिटनचा सर्वांत मोठा आर्थिक पराभव आहे’ :—मि. रॉबर्ट बूथबी, पार्लमेंटचे सभासद.

## रेल रोड को-ऑर्डिनेशन व मोटार धंद्याचें भवितव्य

लेखकः—श्री. रा. ना. गोडबोले, बी. ए., बी. कॉम., सी. ए. आय. आय. बी., सातारा

मुंबई सरकारच्या रेल रोड को-ऑर्डिनेशनच्या स्कीममुळें सर्व मोटारवाले अगदी बेचैन झाले आहेत व आपलें पुढें काय होणार याची भ्रांत व भीति सर्वांना पडली आहे. सरकारची तात्पुरती योजना तर सुरू जहाली आहेच. पुणें-मुंबई, पुणें-नगर वगैरे ठिकाणीं रेल्वेच्या मोटारीही सुरू जहाल्या आहेत व त्यामुळें तेथें पूर्वी चालू असलेल्या मोटारींचें उत्पन्न घटत आहे व आज कित्येक वर्षें या धंद्यावर उपजीविका करणाऱ्यांची परिस्थिति गंभीर होत चालली आहे.

### सरकारी योजना

कायमच्या योजनेकरतां मुंबई सरकारनें इलारुयाचे ११ झोन्स पाडले आहेत व प्रत्येक झोनवर एकेक कंपनी स्थापन होणार आहे. या कंपन्यांचे प्रमोटर्स व म्यानेजिंग डायरेक्टर्स यांची निवडही जहाली आहे. हल्लींच्या मोटार कंपन्यांच्या गाड्या घेण्याकरितां व्हॅल्यूएशन बोर्ड स्थापनेबाबत नोटिसाहि निघाल्या आहेत. नवीन कंपनींत एकंदर शेअर भांडवलापैकीं ३५ टक्के मुंबई सरकारचे, ३० टक्के रेल्वे बोर्डाचे, २५ टक्के हल्लींच्या मोटार वाल्यांचे व १० टक्के प्रमोटर्स लोकांचे असे शेअर्स रहाणार आहेत. या शिवाय प्रत्येक बी पार्ट मागें रु. १००० किंवा रु. १००० चे शेअर्स मोटार मालकास मिळणार असल्याचें समजतें. वरील योजना गेल्या जून मध्यें प्रसिद्ध होतांच मी तावडतोब या योजनेंतील सर्व दोष मि. टी. टी. कोठावाला प्रॉव्हिन्शियल मोटार ट्रान्स्पोर्ट कंट्रोलर यांचे नजरेस पत्रद्वारें आणले. त्यांनीं त्या बाबत मला भेटीस बोलाविलें व ही भेट ता. २५-६-४५ रोजीं जहाली. ही योजना मोटार मालकांचे फार नुकसान करणारी आहे, असें मी त्यांना पटविलें. पण ही योजना मागें घेतां येणें शक्य नाहीं असें त्यांनीं सांगितलें.

### मुंबई प्रांतिक मोटार युनियन्स कॉंग्रेसचें दुटप्पी धोरण

ही मोटार युनियन्स कॉंग्रेस मुंबई प्रांतांत मोटार मालकांचे तर्फे चळवळ करणारी संस्था आहे. वरील मि. कोठावाला यांचें उत्तरानें माझें समाधान जाहलें नाहीं म्हणून मी या मोटार कॉंग्रेसच्या पुढाऱ्यांना भेटून या बाबत कांहीं चळवळ करणें आवश्यक आहे असें पटविलें. चळवळ म्हणजे एक तर स्कीम अजीबात मान्य न करतां पूर्णपणें त्या विरुद्ध चळवळ करावयाची किंवा आहे ती स्वीकारून जास्त फायदा मिळणेंकरतां भांडावयाचे. मग स्कीम झिडकारल्यामुळें वाटेल त्या हालअपेष्टा सोसाव्या लागल्या तरी त्यास तयारी दाखवयाची. या गोष्टीस साताऱ्यांतील सर्व मोटार-वाले तयार होते व त्यांनी ता. ४-२-१९४५ रोजीं जेव्हां मोटार कॉंग्रेसचे पुढारी सातारा येथें आले होते तेव्हां या बाबत त्यांना स्पष्ट बजावलें होतें. जून १९४५ मध्यें स्कीम प्रसिद्ध जहालेनंतर आमचे मोटार कॉंग्रेसच्या पुढारी लोकांनीं स्कीम राबविण्याचें ठरविलें व त्याप्रमाणें त्यांनीं नवीन कंपन्यांचे प्रमोटर्सकरतां अर्जही मोटारवाल्यांचेकडून देवविले. याप्रमाणें मोटार कॉंग्रेसनें स्कीम मान्य केली व प्रमोटर्सचे अर्जावर मोटार मालकांच्या सह्याही घेतल्या. पुढें प्रमोटर्सची निवडही जहाली. मि. कोठावाला यांनीं सर्व जिल्ह्यांतून फिरून ही स्कीम समजावून सांगितली. ते जेव्हां सातारा येथें आले तेव्हां या बाबत काय करावयांचे असा सवाल आम्ही आमच्या मोटार कॉंग्रेसच्या पुढाऱ्यांना केला तेव्हां त्यांनींही योजना राबवावयाची आहे, तुम्हीं खुशाल मान्यता द्या असें सांगितलें व त्याप्रमाणें आम्ही सातार-वाल्यांनीं मान्यता दिली. पुढें प्रमोटर्स बाबत मतमोजणी झाली, त्यांत कांहींची निवड न झाल्याकारणानें पुढाऱ्यांनीं लगेच स्कीम वाईट म्हणून प्रचारास सुरवात केली. प्रत्यक्ष मोटार मालक हे अशिक्षित असलेमुळें त्यांना इतका दूरवर विचार नाहीं. त्यामुळें पुढाऱ्यांनीं कलाटणी देतांच तेही फिरले. साताऱ्याच्या मोटार-वाल्यांनीं मात्र आपलें धोरण कायम ठेवलें आहे.

### हुबळी येथील मोटार परिषद

मुंबई प्रांतिक मोटार कांग्रेसचे ३ रें अधिवेशन ता. ८ व ९ डिसेंबर १९४५ रोजीं हुबळी येथें जहालें. मी स्वतां तेथें हजर होतों. अर्थात या पुढारी म्हणविणाऱ्यांनीं प्रथमपासूनच आपल्या बदललेल्या पवित्र्याचा प्रचार करण्यास सुरवात केली. परिषद् जहाली, ठराव पास जहाले. पुढें काय ? परिषदेंतील मुख्य ठरावानुसार ही योजना फेटाळली आहे व ती पुढें ढकलण्याबाबत सरकारला विनंती करण्यांत आली आहे. वरील धोरण बदलण्याबा-बतचा पुरस्कार करताना श्री. आर. व्ही. कुलकर्णी, सेक्रेटरी साऊथ डेक्कन रीजनल युनियन यांनीं सांगितलें कीं, जून १९४५ मध्यें ९३ कलमा खालीं राज्यकारभार चालू असलेमुळें आपणासच त्रास जहाला असता. पण त्या बाबत माझें असें म्हणणे कीं, तुमचा सरकारशीं झगडा करण्याची तयारी आहे. मग हालअपेष्टांस कां भितां ? व आपलें तत्त्व कां सोडतां ? त्यांनीं दुसरा आक्षेप असा घेतला कीं पुढें येणारे सरकारनें म्हणजे कांग्रेस सरकारनें आम्हांस लेखी आश्वासन दिल्यास सर्व लोक विरोध करण्यास तयार आहेत. पण हें त्यांचें म्हणणें चूक आहे. कारण ही मागणी एकाहि मोटारवाल्यानें केली नाहीं. पुढें येणारें सरकार आपलें आहे व तें अनंत पटींनीं हल्लींच्या नोकरशाहीपेक्षां विश्वसनीय आहे ही गोष्ट सांगण्याची जरूरी नाहीं.

### (राजकीय) कांग्रेस पुढाऱ्यांचीं भाषणें

परिषदेचे अध्यक्ष श्री मिनू मसाणी होते. तसेच सभेंत श्री. काकासाहेब गाडगीळ, श्री. भाऊसाहेब हिरे, श्री. करमरकर वगैरे यांचीं भाषणें जहालीं. या सर्वांच्या भाषणांत त्यांनीं रोड ट्रान्स्पोर्टचें महत्व सांगितलें. परंतु मोटारवाल्यांचे बाजूनें कोणीही आश्वासन दिलें नाहीं. कॉंग्रेस अधिकारारूढ जहाल्यास सर्वांना न्याय मिळेल असें त्यांनीं सांगितलें व त्याबद्दल कोणालाही शंका नाहीं. तर उलट श्री. काकासाहेबांनीं स्पष्ट इशारा दिला कीं, मोटारवाल्यांना हे २५ टक्के शेअर्स देऊन त्यांची सरंजामी कां उत्पन्न करावी ? ते पुढें म्हणाले कीं, मोटारवाल्यांनीं मि. ब्रिस्टोच्या सुरीनें मरण्यापेक्षां श्री. काकासाहेबांच्या सुरीने मेलेलें काय वाईट ? ठीक आहे. पण मला धंद्याच्या दृष्टीनें बोलावयाचें जहाल्यास असें सांगावयाचें कीं मि. ब्रिस्टो हे मोटारवाल्यांना थोडे जिवंत ठेवीत आहेत पण श्री. काकासाहेब पूर्ण सुरी फिरवीत आहेत.

### मोटार मालकांना इषारा

मी पक्का राजकीय कॉंग्रेसचा आहे व सर्व राजकीय पुढाऱ्यां-बद्दल मला अतिशय आदर आहे. मी मोटार कॉंग्रेसमध्येंही आज-पर्यंत होतो. पण वरील दुटप्पी धोरणामुळें मी त्यांचेंशीं माझा संबंध सोडून दिला आहे. कॉंग्रेस सरकार आल्यास मोटार माल-कांना निश्चित न्याय मिळेल व श्री काकासाहेबांच्या शब्दांत सांगावयाचें म्हणजे त्यांच्या रास्त मागण्यांचा विचार केला जाईल व तें अगदी मान्य आहे. कारण श्री भुलाभाई देसाई यांनीं सांगितलेप्रमाणें कॉंग्रेसला केवळ थोड्या मोटार मालकांना जगवा-वयाचें नाहीं. ४० कोटी जनतेच्या भाकरीचा प्रश्न सोडवावयाचा आहे. याबाबत दोन मुद्दे लक्षांत घेणें जरूर आहे. (१) को-ऑर्डि-

(पान ४५२ पहा)

# स्फुट विचार

### ब्रेटन वुड्स् करार

कर्जविषयक अँग्लो-अमेरिकन कराराच्या अंमलबजावणीशी ब्रेटनवुड्स् करार आणि त्यांतील इंटरनॅशनल मोनेटरी फंड व इंटरनॅशनल बँक ह्यांचा फार निकटचा संबंध असल्यानें, त्या संबंधांतील हिंदुस्थानाच्या परिस्थितीचा खुलासा येथें करणें आवश्यक आहे. चलन व हुंडणावळ ह्याविषयीं आंतरराष्ट्रीय सहकार्य घडून यावें, हा प्रस्तुत मोनेटरी फंडाचा उद्देश आहे आणि हिंदुस्थानानें त्यांत मूळ सभासद म्हणून दाखल होण्याची शेवटची तारीख ३१ डिसेंबर ही आहे. ब्रेटनवुड्स कराराबाबत मध्यवर्ती असेंब्लीचा सल्ला घेण्यांत येईल, असें तेव्हांचे फडणवीस सर जरेमी राइस्मन ह्यांनीं आश्वासन दिलें होतें. परंतु असेंब्लीचें त्यानंतर अधिवेशनच भरलें नाहीं त्यामुळें मध्यवर्ती विधिमंडळाचा अधिकृत सल्ला सरकारास मिळूं शकणार नाहीं. तथापि हिंदी व्यापारी प्रातिनिधिक मंडळांपैकीं प्रमुख तिघांचा सल्ला हिंदुस्थान सरकार घेणार आहे. आतांच हिंदुस्थानानें सभासदत्व पत्करल्यास त्याला एक्झिक्यूटिव्ह कमिटीवर जागा मिळूं शकेल व पुढें उपस्थित होणाऱ्या प्रश्नांच्या महत्त्वाच्या प्राथमिक चर्चेंत भाग घेतां येईल, असा हिंदुस्थानच्या सभासदत्वास पाठिंबा देणाऱ्यांचा मुख्य मुद्दा आहे. हिंदुस्थानाचा त्यामुळें आंतरराष्ट्रीय दर्जा वाढेल, हिंदुस्थान एककल्ली आहे असा त्याचेवरील संभाव्य आरोप टळेल, वगैरेहि मुद्दे पुढें मांडण्यांत येत आहेत. ब्रेटन वुड्स करारास मान्यता देणें आर्थिकदृष्ट्या फारसें फायद्याचें नसलें तरी व्यवहार व धोरण ह्या दृष्टीनें तो करार स्वीकारला पाहिजे, असेंच ग्रेटब्रिटनमधील तज्ञांचें मत आहे. अमेरिकेची मैत्री व उदार वृत्ती टिकविण्यासाठी द्यावयाची ती किंमत आहे. अमेरिकन कर्ज मिळालें तरच ग्रेटब्रिटन ब्रेटनवुड्स करारांतील जबाबदाऱ्या पत्करूं शकेल, हें ब्रिटिश फडनवीस ह्यांनीं नुकतेंच स्पष्ट केलें आहे.

---

### "कर्जांत काट होणार, मग तें वाढवूं तरी नका"

सर चुनिलाल भाईचंद मेहता ह्यांनीं गेल्या आठवड्यांत मुंबई येथें भाषण केलें. त्यांत त्यांनीं अँग्लो-अमेरिकन आर्थिक कराराची पार्श्वभूमि समजावून सांगितली. युद्ध संपून गेल्यानंतरहि अजून हिंदुस्थान ग्रेट ब्रिटनला येथें माल खरेदी करूं देत आहे. त्यामुळें हिंदुस्थानाचें ग्रेट ब्रिटनमधील येणें फुगत चाललें आहे. हिंदुस्थानाच्या येण्यांत पुढें काट मारावयाची जर आहे, तर तें आज फुगविण्यांत हिंदुस्थानाचें नुकसानच नाहीं काय? असा सरळ प्रश्न त्यांनीं विचारला आहे. रिझर्व्ह बँकेनें ठराविक मर्यादेपलीकडे स्टर्लिंग पौंडांतील आपली शिल्लक वाढवूं देऊं नये; बँकेच्या सेंट्रल बोर्डानें त्याप्रमाणें स्पष्ट ठराव करावा आणि त्याचा सल्ला हिंदुस्थान सरकारनें मानला नाहीं, तर त्याहिपुढें जाऊन धैर्यानें योग्य ती योजना करावी, असें सर चुनिलाल ह्यांनीं सांगितलें.

---

### शेअर दलालांना सल्ला

गुजराथ स्टॉक अँड शेअर एक्सचेंजचा रौप्य महोत्सव शेठ कस्तुरभाई लालभाई त्यांच्या अध्यक्षतेखाली नुकताच साजरा झाला. उद्योगधंद्यांस लागणारें भांडवल शेअर्सच्या स्वरूपांत उभारून लिमिटेड कंपन्या स्थापन केल्याविना मोठ्या प्रमाणावर उद्योगधंदे काढणें आतां अशक्य झालें आहे. अशा शेअर्सची उभारणी व खरेदी-विक्री करण्याचें शेअर बाजार हें मुख्य साधन आहे. शेअर बाजाराचें महत्त्व व्यापार आणि उद्योगधंदे ह्यांचे संबंधांत फारच मोठें आहे. उद्योगधंद्यांच्या वाढीस शेअर बाजाराचें अधिकाधिक सहाय मिळावें ह्या दृष्टीनें शेठ कस्तुरभाई ह्यांनीं आपल्या भाषणांत कांहीं सूचना केल्या. दलालांनीं योग्य तो अभ्यास करून आपल्या गिऱ्हाइकांना त्यांच्या हिताचा सल्ला द्यावा आणि वेगवेगळे धंदे, त्यांची व्यवस्था व त्यांचें भवितव्य ह्याविषयीं गिऱ्हाइकांस नेहमी माहिती देत रहावी असें ते म्हणाले. शेअर बाजारांतील सट्टेबाजीचें उच्चाटण करण्याचा त्यांचा सल्ला आहे. अर्थात, शेअर बाजारांतील कसलेल्या सट्टेबाजांवर त्याचा कांहींहि परिणाम होणार नाहीं.: लोकांनीं आपले पैसे फक्त गिरण्यांच्या शेअर्समध्येंच न गुंतवितां लहान प्रमाणावरील उद्योगधंद्यांच्या शेअर्सकडेहि त्यांनीं लक्ष पुरवावें व त्या धंद्यांच्या जोपासनेचें श्रेय घ्यावें, अशीहि शेठ कस्तुरभाईंची सूचना आहे.

---

### बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लि.

ऑक्टोबर १९४४ ते सप्टेंबर १९४५ ह्या बारा महिन्यांच्या कारभारांत वरील कंपनीस घसारा व मॅनेजिंग एजंटांचें कमिशन ह्यांची तरतूद करून १,०२,८०२ रु. निवळ नफा झाला. ऑर्डिनरी भागांस १०% व प्रेफरन्स भागांस ५% डिव्हिडंड कायम ठेवण्यांत आलें आहे. कंपनीच्या कारखान्यांत १,००० एकरांत होणाऱ्या उसाचीच साखर होऊं शकते. त्याची 'क्रशिंग कपॅसिटी' वाढविण्यासाठी साखर करण्याचीं मोठीं यंत्रें विकत घेणें जरूरीचें झालें आहे आणि त्याकरितां ७० लक्ष रुपयांचे शेअर्स विक्रीस काढावे, असें संचालकांचें मत आहे. कंपनीकडील ठेवींची रक्कम २५ लक्ष रुपयांची आतां ४३½ लक्ष रुपये झाली आहे. नवीन शेअर्समध्यें त्यापैकीं बऱ्याच रकमेचें रूपांतर होणें अगदी संभवनीय आहे.

---

### ब्रिटिश पायतणांची निर्गत

ब्रिटिश पायतणांची निर्गत वाढविण्याचा विचार चालू आहे परंतु ह्या वाढीस फारसा वाव नाहीं, असें दिसतें. युद्धापूर्वी इतकी निर्गत शक्य दिसत असली तरी दक्षिण आफ्रिका, इजिप्त, पॅलेस्टाइन, हिंदुस्थान, इत्यादि ठिकाणचें उत्पादन युद्धकाळांत पुष्कळच वाढलें असल्याकारणानें आणि दक्षिण अमेरिकेंतील देशहि पायतणांचें उत्पादन करूं लागल्याकारणानें, सरकारी सहायावाचून हा ब्रिटिश धंदा १९३० च्या उच्च स्थानास पोचण्याचा संभव नाहीं. युरोपांतील देश व जपान ह्यांची स्पर्धा बंद पडली आहे आणि जगांतील सर्व ठिकाणच्या दुकानांतील पायतणांचीं कपाटें रिकामी झाली आहेत. तथापि, ह्या अनुकूल परिस्थितीचा फायदा ब्रिटिश कारखानदारांस मिळणें ब्रिटिश सरकारच्या मदतीवर अवलंबून आहे. ब्रिटिश कातडी पायतणांच्या निर्गतीचे तुलनात्मक आकडे खालीं दिले आहेत:—

| वर्ष | पायतणांच्या जोड्या (लक्ष) | किंमत (लक्ष पौंड) |
|---|---|---|
| १९३० | १०८ | ४० |
| १९३१ | ८३ | २९ |
| १९३२ | ७७ | २४ |
| १९३३ | ६३ | १९ |
| १९३४ | ५३ | १६ |
| १९३५ | ४५ | १४ |
| १९३६ | ४४ | १५ |
| १९३७ | ५१ | १६ |
| १९३८ | ४४ | १५ |
| १९३९ | ४० | १४ |

## हिंदी अर्थशास्त्रज्ञांच्या मार्गांतील अडचणी

मराठा चेंबरचे एक सल्लागार, प्रा. द. गो. कर्वे ह्यांची लाहोर येथें भरणाऱ्या २८ व्या हिंदी आर्थिक परिषदेचे अध्यक्ष म्हणून निवड झाली आहे. त्याप्रीत्यर्थ चेंबरच्या कार्यकारी मंडळानें त्यांचा ता. १५ रोजीं सत्कार केला. चेंबरचे कार्याध्यक्ष, श्री. द्वा. वा. पोतदार, ह्यांनीं आपल्या प्रास्ताविक भाषणांत प्रा. कर्वे ह्यांच्या कामगिरीचा थोडक्यांत व मुद्देसूदपणें परिचय करून दिल्यावर श्री. आ. रा. भट व श्री. दत्तोपंत फाटक ह्यांचीं प्रा. कर्वे ह्यांच्या गौरवपर भाषणें झालीं. न्यायमूर्ति रानडे ह्यांची उज्वल परंपरा चालविण्याचें महत्कार्य प्रा. काळे ह्यांनीं अंगिकारलें व त्यांचे सत्शिष्य प्रा. कर्वे ह्यांनीं ती परंपरा राखली आहे, असें श्री. भट ह्यांनीं सांगितलें. प्रा. कर्वे ह्यांच्या उत्तरानंतर श्री.श्री. वा. काळे ह्यांनीं आभारप्रदर्शन केल्यावर अल्पोपहारानंतर सभेचें काम संपलें.

### प्रा. कर्वे ह्यांचें भाषण

प्रा. कर्वे हे आपल्या भाषणांत म्हणाले, “रानडे, टिळक, आगरकर, ह्यांनीं दिलेली स्फूर्ति व केलेला स्वार्थत्याग हीं एवढी मोठीं आहेत कीं, त्यांनीं घालून दिलेला धडा केवळ गिरविला तरी मोठें कार्य होऊं शकतें. भोंवतालच्या परिस्थितींस अनुसरूनच अर्थशास्त्रज्ञांच्या कार्याचें तेज पडूं शकतें आणि विशिष्ट परिस्थितींत विशिष्ट मतें आणि तत्त्वें ह्यांचा उदय होतो. हिंदी राजकीय परिस्थिति ज्या प्रमाणांत आपणांस अनुकूल होईल, त्या प्रमाणांत हिंदी अर्थशास्त्रज्ञांची उपयुक्तता वाढेल. भरमसाट चलनवाढीवर वीस प्रमुख हिंदी विचारी अर्थशास्त्रज्ञांनीं आपले विचार व्यक्त करणारें एक पत्रक काढून तें हिंदुस्थान सरकारच्या फडनवीसांकडे धाडलें, त्याची साधी पोंच सुद्धां आली नाहीं, ह्या एका उदाहणावरून अर्थशास्त्रज्ञांस भोंवतालच्या परिस्थितीचा आधार कां हवा, हें स्पष्ट होईल. ह्या पुढील काळांत हिंदी अर्थशास्त्रज्ञांच्या मतांस अधिकाधिक महत्त्व मिळत जाईल, हें उघड आहे. रानडे प्रभृति थोर पुढाऱ्यांनीं ह्या पूर्वी केलेल्या कार्यांची महति किती मोठी आहे, हें वरील गोष्टींवरून कळून येईल.”

### ब्रिटननें काढलेलें अमेरिकेचें कर्ज

हिंदुस्थान सरकारचे पूर्वीचे व्यापार मंत्री श्री. एन. आर. सरकार हे ब्रिटनला मिळालेल्या अमेरिकन कर्जाबद्दल बोलतांना म्हणाले कीं, या कर्जानिमित्तानें ब्रिटननें हिंदुस्थानच्या केलेल्या देण्यांत सूट मागणें अगदी अयोग्य आहे. या हिंदुस्थानच्या देण्यांत सूट मागतांना असा मुद्दा पुढें आणण्यांत येतो कीं युद्धांत हिंदुस्थानच्या सरहद्दीबाहेर नेलेल्या हिंदी सैन्याचा सर्व खर्च ब्रिटननें सोसला व हिंदुस्थानच्या संरक्षणाचा भार उचलला; परंतु ते म्हणाले कीं, हा समज चुकीचा आहे. या सैन्याचा उपयोग हिंदुस्थानच्या संरक्षणाकरितां न होतां शाही राज्याच्या व वसाहतींच्या संरक्षणासाठीं व ब्रिटनचा जगांतला दबदबा वाढवण्याकडे करण्यांत आला असें ते म्हणाले.



व्ही. पी. बेडेकर
आणि सन्स लि.
मुंबई.
मसाल्याचे
व्यापारी
पुणें एजंटः—
द. ना. हेजीब

नोगीचें
डोंगर
छाप
शुद्ध निलगिरी तेल.
नोगी आणि कं. मुंबई ४

डोंगरे
यांच्या
बालामृतानें
अशक्त मुलें
सशक्त होतात.

लहान मुलांकरितां
आर्को
गोड —एरंडेल— वापरा
: लक्ष्मी एजन्सी :
मंगळवार पेठ, कोल्हापूर

सर्व प्रांतांतील सुती, गरम व रेशमी खादीचा सुंदर संच
खादी मन्दिर
२६२, बुधवार पेठ, ढमढेरे बोळाजवळ, पुणें २

तयार कपड्यांचे व्यापारी
महिंद्रकर ब्रदर्स
गिरगांव, मुंबई नं. ४
व बुधवार चौक, पुणें

## मुंबई शेअर बाजार

( वि. म. लिमये आणि मं. यांजकडून )

व्याज–वजा ( xd )
बॉम्बे बर्मा रु. ७–८–० दि. ३१–१२–४५
असो. सीमेंट रु. ७–०–० दि. १४—१–४६
बेलापूर रु. ८–०–० दि. १५—१–४६
सिंप्लेक्स रु. ४–०–० दि. १४—१–४६

| १९४४ मधील चढउतार | दिलेलें व्याज † खंडित S अंतिम | व्याज केव्हां मिळतें | कंपनीचें नांव | मूळ रु. | सोमवार १०।१२।४५ | मंगळवार ११।१२।४५ | बुधवार १२।१२।४५ | गुरुवार १३।१२।४५ | शुक्रवार १४।१२।४५ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २३१५; १९१६ | १२९–८–९ | ऑगस्ट | टाटा डिफर्डस् | ३० | २५४२—८ | २५५८–१२ | २५७२—८ | २५४५—० | २५५५—० |
| ४३५; ३६९ | २३–०–० | ऑगस्ट | टाटा आर्डिनरी | ७५ | ४६०—० | ४६४—८ | ४६९—० | ४५८—० | ४६३—८ |
| २२०१; १६९५ | २५–०–०† | मार्च–सप्टें. | बॉम्बे डाईंग | २५० | २१४५—० | २१५८–१२ | २१५७—८ | २१४२—८ | २१३८–१२ |
| ७६५; ५३३ | ९——०† | मार्च–सप्टें. | कोहिनूर | १०० | ६५६—८ | ६६४—० | ६६४—० | ६६०—० | ६६५—० |
| ६५१; ४७५ | २२–०–० | मे | स्वदेशी | १०० | ६२०—८ | ६२३—८ | ६२४—० | ६२१—० | ६२०—० |
| ४९८; ३६१ | ९–०–०S | नोव्हें.–एप्रिल | नागपुर | १०० | ४१७—० | ४२१—८ | ४२२—० | ४२०—० | ४१९—८ |
| ३७७; २६५ | १५–०–० | एप्रिल | फिनले | १०० | ३१९—८ | ३१९—० | ३१८—८ | ३२०—० | ३१८—८ |
| ३९४; २८२ | ५–०–०† | ऑक्टो.–एप्रिल | गोकाक | १०० | ३२०—० | ३१९—० | ३१९—० | ३१९—० | ३१७—८ |
| ३०५; २१८ | ४–०–०† | जाने.–जुलै | सिंप्लेक्स | ५० | ३२४—८ | ३२७—८ | ३२८—० | ३२४—० | ३२३—८ |
| ५-१०-६; ३-६ | ०–४–० | मार्च | अपोलो | २ | ४—७ | ४—७ | ४—७ | ४–१०–६ | ४—८–६ |
| २१-१४;१३-४-६ | ०–१५–० | मे | इंडि. यु. ऑर्डि. | १० | १६—१ | १६—२ | १६—६ | १६—६ | १६–५–० |
| ४-९; २-७ | ०–३–० | मे | ,, डिफर्डस् | १ | ३—३ | ३—३ | ३—३ | ३—४ | ३–३–६ |
| १२७०; ६३० | ३५–०–० | ऑगस्ट | इंदूर माळवा | १०० | ७२६—८ | ७७३–१२ | ७७१—४ | ७७२—८ | ७७० —० |
| २५४; २१६ | ७–०–० | जानेवारी | असो. सीमेंट | १०० | २३५—४ | २३५—८ | २३७—८ | २३६—८ | २३६—८ |
| २५९; २१९ | ९–०–० | जानेवारी | बेलापूर शुगर | ५० | २३५—० | २३६—० | २४०—० | २४०—० | २३९—८ |
| ५७५; ३७६ | ७–८–० | डिसेंबर | बॉम्बे बर्मा | १२५ | ५७६—४ | ५८०—० | ५७६—४ | ५७७—८ | ५७७—८ |
| ३८; २९-२ | १–४–० | जानेवारी | शिंदिया स्टीम | १५ | ३९—० | ३९—० | ३८–१५ | ३९—० | ३८–१३ |
| | | ० | ३½% रोखे | १०० | १०३—९ | १०३—९ | १०३—८ | १०३—८ | १०३–८–० |

शुक्रवार दि. १४–१२–४५ चे भाव

| ३% गव्हर्मेंट लोन्स | | बँका | | वीज कंपन्या | | संकीर्ण | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १९४६ | १०२—०–० | बरोडा | १६३—८ | आंध्रा व्हॅली | १८३०—० | अलकॉक | ४४०—० |
| १९५१–५४ | १०१–११–६ | सेंट्रल | १०२—८ | बॉम्बे ट्रॅम | १५१–४ | चौंचे स्टीम | ६२६—४ |
| १९५७ | १००–१०–६ | इंडिया | २२६—८ | टाटा हायड्रो | २१५–० | न्यू इंडिया | ९३—४ |
| १९५९–६१ | ९९–१५–० | इंपी० | २४४७—८ | टाटा पॉवर | १९४२–८ | शिवराजपुर | ५८—४ |
| १९६३–६५ | ९९—८–० | | ६०५—० | | | टाटा केमिकल | १८–१४ |
| १९६६–६८ | ९८–१०–० | रिझर्व्ह | १५६—० | | | टाटा ऑईल | ८२—० |
| १९७०–७५ | ९७—८–० | युनियन | ११–१२ | | | | |

' नाताळानिमित्त ' शनिवार दि. २२ पासून बाजार बंद आहे.
चालू वळण शुक्रवार दि. २१–१२–४५ ला पुरे होऊन त्याची पटावट ४ जानेवारी १९४६ ला होईल.


# ठेवी घेणें आहेत

**श्रीलक्ष्मी टेक्स्टाइल मिल्स लि., भोर**

**अधिकृत भांडवल १५ लाख**

**खपलेलें भांडवल ८॥ लाख**

मिलसची एकूण जिंदगी रु. १० लाखांची असून, मशिनरी रु. ६ लाख, इमारत रु. ३ लाख व कच्चा–पक्का माल रु. १ लाखाचा आहे. गिरणीसाठीं आणखी मशिनरी खरेदी होत असून चात्याहि वाढविण्यांत येणार आहेत.

कंपनीच्या वाढत्या व्यापासाठीं ठेवी घेणें आहेत. व्याजाचा दर १ वर्ष ५ टक्के, २ वर्षें ५॥ टक्के.

**माहितीपत्रक व ठेवीच्या अर्जाचा नमुना मागवा**

**पायोनियर डाइंग हाऊस,**

**८१४ सदाशिव, पुणें २.**


**दि बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट, लिमिटेड.**
**९८० सदाशिव पेठ, लक्ष्मी रोड पुणें २**

### नोटीस

ता. ४ फेब्रुवारी, १९४६ नंतर सिंडिकेटच्या भागीदारांना त्यांचीं डिव्हिडंड वॉरंटस् रवाना करण्यांत येतील. तरी ज्या भागीदारांचे पत्ते बदलले असतील त्यांनीं आपले बदललेले पत्ते सिंडिकेटचे ऑफिसांत कळविण्याबद्दल विनंति आहे.

सी. जी. आगाशे आणि कं.
मॅनेजिंग एजंटस




ठकूर सावदेकर कंपनी पुणे

### खतें घालून माशांची लागवड

हिंदुस्थानांत खाद्य-पदार्थ अधिक पिकविण्याच्या मोहिमेंत मच्छीमारीस महत्त्वाचें स्थान आहे. पाण्यांतील माशांची संख्या कशी वाढवावी याबाबत पाश्चात्य देशांत कांहीं प्रयोग चाललेले आहेत त्या संबधांत इंपीरियल केमिकल इंडस्ट्रिजनें काढलेल्या पत्रकांतील पुढील माहिती या दृष्टीनें महत्त्वपूर्ण आहे:—

मोठ्या प्रमाणावर माशांची संख्या वाढवावी असा संकल्प शास्त्रज्ञांनीं अजून केलेला नाहीं व तसें करणें आतां तरी शक्य दिसत नाहीं. तरीपण प्रयोगावरून असें दिसून येतें कीं जसें खत खालून पीक अधिक निघूं शकतें तसेंच पाण्यांत खत घातल्यास मासेहि अधिक निघतात. प्रत्येक माशाची मादी हजारों अंडीं घालते पण त्यांतील फारच थोडे मासे मोठे होईपर्यंत जगतात. याचें कारण मुख्यत: खाण्याची कमतरता होय असें दिसतें. ज्याप्रमाणें जमिनीवरील जनावरांची पैदास कुरणांच्या वाढीवर अवलंबून आहे, त्याचप्रमाणें माशांची वाढ समुद्रांतील वनस्पतींवर अवलंबून आहे. मात्र ह्या वनस्पती म्हणजे तळाशीं उगवणाऱ्या वनस्पती नाहींत. या वनस्पती पाण्यांत अर्धवट तरंगत असतात व त्यांस फायटोप्लँक्टन असें सर्व साधारण नांव आहे. यांवर कांहीं लहान कृमि जगतात व त्यांवर लहान मासे जगतात. हे मासे मोठ्या माशांचें खाद्य होत. फायटोप्लँक्टन वाढविण्यास पाण्यांत नायट्रेट व फॉस्फेट खत शास्त्रज्ञांनीं टाकलें. लवकरच तळ्यांतील माशांची संख्या दुप्पट झाली व कांहीं माशांचें वजन २५ पटींनीं वाढलें! आर्थिक दृष्टीनें हें कितपत परवडतें याचा अंदाज पत्रकांत दिलेला नाहीं परंतु शास्त्रीय दृष्टीनें प्रयोग यशस्वी झाले आहेत हें निश्चितपणें पत्रकावरून दिसतें. हेच प्रयोग आतां अधिक मोठ्या प्रमाणावर चालू आहेत.

---

( पान ४४८ वरून चालू )

नेशन व (२) नॅशनलायझेशन. येणाऱ्या कांग्रेस सरकारला जर नुसते को-आर्डिनेशन करावयाचे असल्यास ते निश्चितपणे कांहीं मध्यवर्ती मार्ग काढून मोटार मालकांचे नुकसान होऊं देणार नाहीं. म्हणजे या धंद्यांत हल्लीचे मोटार मालक राहूं शकतील. परंतु कांग्रेस सरकारच्या निवडणूकीच्या जाहिरनाम्याप्रमाणें त्यांस वहातुकीच्या धंद्याचें राष्ट्रीयकरण करावयाचे आहे. सार्वजनिक उपयोगी मूलग्राही धंदे देशाचे व्हावेत याबद्दल कोणाचें दुमत असण्याचें कारण दिसत नाहीं. आज मोटार मालकापुढे हल्लीच्या सरकारला तोंड देण्याचा प्रश्न आहे. गाड्यांचे व्हॅल्युएशनबाबत सरकारकडून पत्रेही आली आहेत. तेव्हां सत्याग्रह करून सरकारी योजना धुडकाऊन लावण्याचा प्रयत्न करून पुढील अनिश्चित भवितव्यावर अवलंबून रहाणें हा एक मार्ग आहे. किंवा आज धंदा व राजकारण यांची सांगड न घालता धंद्याचे दृष्टीनें काय मिळतें तें घ्यावयाचे व जास्त मिळविण्याकरितां सरकारशी झगडा करावयाचा हा दुसरा मार्ग आहे. कारण आज आपण मिळते त्याचा स्वीकार केला तरी त्यामुळें पुढे येणाऱ्या कांग्रेस सरकारला मोटार मालकांचे जास्त हित करण्यास कांहीं अडकाठी नाहीं. लोकतंत्र राज्यव्यवस्था आल्यास त्यांनीं प्रमोटर्स रद्द करणे, त्यांचे शेअर्स हल्लीच्या मोटार मालकांना वर्ग करणे, म्यानेजींग डायरेक्टर्सचे पगार कमी करणे वगैरे मार्गांनीं त्यांना कोआर्डीनेशन करतां येऊन हल्लीच्या मोटारमालकांचे हित करतां येईल. अथवा सर्वच धंद्यांचे राष्ट्रीयकरण करतां येईल. आज मोटार मालकापुढें परिस्थिती फार कठीण आहे या दृष्टीने वरील सर्व मुद्दे लक्षांत घेऊन ते योग्य त्या दिशेने जातील अशी मला आशा आहे.

---


**पैसा आणि ज्ञान वाढवा !**

श्रीमंत कसें व्हावें?—संपत्तीचा सुंदर मार्गदर्शक किं. १॥ रु., यशाचा सूर्योदय—व्यापारांत नक्की यश मिळतें किं. १॥ रु., काम आणि कामिनी—नैसर्गिक सौख्याचें सुंदर विवेचन करतें किं. १॥ रु., मृत्युलोकचा प्रवास—अद्भुत कथानक! किं. १ रु.

मेसर्स—विपट आणि मंडळी,
पो० कराड, जि. सातारा.

**बिनचूकच्या माहितीनें**

मोजक्या प्राप्तींत वाढत्या संसारखर्चास सहज आळा घालतां येतो

प्रत्यक्ष माहिती मोफत —— किंमत ४ आणे

—धी बॉम्बे जनरल एजन्सी—
भायखळा पुल, नं. १७ मुंबई.

**झारापकर**
**टेलरिंग कॉलेज**
दादर, मुंबई १४.
माहिती मोफत मागवा

सुंदर व रसिक स्त्रियांची निवड
**आशा**
Asha
**सौंदर्य साधनें**

विक्रीसंघटनेचा व्याप पेशावर ते मदुरा व क्वेट्टा ते कलकत्त्यापर्यंत पसरला आहे.

( स्वत:चे डेपो: मुंबई—गोवा—बंगलोर—दिल्ली )

वरील माल तयार करणाऱ्या महाराष्ट्रीय शास्त्रज्ञांचा कारखाना

**दि आयडिअल इन्स्टिट्यूट**
४५, प्रिंसेस स्ट्रीट, मुंबई २.

—कारखान्याच्या वाढीसाठी ठेवी घेणें आहेत.—


**'अर्थ' ग्रन्थमाला.**

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार

हे पत्र पुणें, पेठ मांगुडां घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व रा. श्रीपाद वामन काळे. बी. ए., यांनीं 'दुर्गाविलास,' मांगुडां, घ. नं. १२४।१, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.